(महाराष्ट्र पोलीस राजपत्र विभागीय भाग - ६ करीता)

क्र.पोमसं/५/१०/अर्हता-२०१३(पदोन्नती-२०२१)/५५/२०२१.
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंह् मार्ग, कुलाबा,
मुंबई - ४०० ००१.
दिनांक :-०१/०९/२०२३.

वाचा:-
१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि.०१/०८/२०१९
२) महसुली विभाग वाटप नियम-२०२१, दि.१४/०७/२०२१
३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१
४) सन २०१४, महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, दिनांक २५ जुन २०१४ व सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, दिनांक ०६ एप्रिल,२०१५
५) शासन पत्र गृह विभाग क्र. संकीर्ण-०६२०/प्र.क्र.२७६/पोल-५ब, दि.२८/०९/२०२०
६) महाराष्ट्र पोलीस नियमावली, भाग-१, १९५९ मधील नियम ३३ व ५६(३)
७) गृह विभाग क्रमांक पीएमएन - ०६२२ / प्र.क्र.३७० / पोल - ५ ब, दि.२८/०६/२०२२

## -: आदेश :-

विभागीय अर्हता परीक्षा - २०१३ मध्ये उत्तीर्ण असलेल्या पोलीस अंमलदारांना स्थानापन्न २५ टक्के कोट्यातून पदोन्नती देण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीने निवडसूची सन २०२२-२३ करिता दि.२१/०२/२०२३ रोजीच्या बैठकीत पात्रता तपासून खुले ठेवलेल्या तसेच अपात्र पैकी ज्या अंमलदारांची पात्रता पुन्हा वर्तुळीत पद्धतीने तपासून पात्र ठरवलेल्या खालील नमूद अंमलदारांना निवडसूची सन २०२२-२३ वर पदोन्नती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२. पोलीस दलातील पोलीस उप निरीक्षक हे पद गट-ब (अराजपत्रीत) या दर्जाचे आहे व पदोन्नतीकरिता पात्र झालेले पोलीस अंमलदार हे पोलीस उप निरीक्षक गट-ब (अराजपत्रीत) या पदावर पदोन्नतीने नियुक्त केले जाणार आहे. त्यामुळे शासन अधिसूचना-महाराष्ट्र शासकीय गट "अ" व गट "ब" (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०२१, दि.१४/०७/२०२१ या प्रकरणी लागु होतात. करिता सदरहु पात्र अंमलदारांकडून महसुली विभागाची पसंती घेण्यात आली आहे.

३. सदरहु नियमावलीतील पदोन्नतीने नियुक्तीकरिता नियम ११ (२) अन्वये, गट-ब (अराजपत्रीत) या पदास पदोन्नतीने महसुल वाटपाचे अधिकार विभाग प्रमुख यांना प्रदान करण्यात आले आहे. सदर अधिकाराचा वापर करुन नियम ६ व ७ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार सदरहु अंमलदारांना महसुल विभाग वाटप करण्यात आले आहे. तसेच सदरहु अंमलदारांकडून त्यांना वाटप झालेल्या महसुली विभागातील तीन घटक कार्यालयाची पसंती घेण्यात आली व त्यांनी दिलेली पसंती, प्रशासकीय निकड ह्याचा सांगोपांग विचार करुन त्यांना पदोन्नतीने पदस्थापनेबाबत त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी प्रस्तावित करण्यात आले आहे.

४. सदरहु नियमावलीतील पदोन्नतीने नियुक्तीकरिता नियम ११ (२) अन्वये महसुल वाटपाचे अधिकार विभाग प्रमुख यांना प्रदान करण्यात आले आहे. सदर अधिकाराचा वापर करुन महसुल विभाग वाटप करण्यात आले आहेत.

५. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२-न च्या तरतुदी नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन, खालील नमूद पोलीस अंमलदारांना स्थानापन्न २५ टक्के कोट्यातील नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक गट-ब (अराजपत्रीत) या पदावर पदोन्नतीने पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्र.५ मधील घटकात करण्यास आस्थापना मंडळ क्र.२ ने मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन खालील नमूद पोलीस अंमलदारांना नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक या पदावर पदोन्नतीने पदस्थापना त्यांचे नावाचे समोर रकाना क्र.५ मध्ये दर्शविण्यात आलेली घटकात करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अंमलदारांचे नाव | सध्याची नेमणूक | वाटप करण्यात आलेला महसुली विभाग | पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | सपोउपनि / ९५ मनोज गुलाबराव नांदुरकर | वर्धा | नागपूर विभाग | नागपूर परिक्षेत्र |
| २ | पोहवा /५११ सुभाष पावजी कोकणी | नवी मुंबई | कोकण-२ विभाग | नवी मुंबई |
| ३ | पोहवा/६३५महमंद सईद मज्जीद खान | सातारा | कोकण-२ विभाग | मिरा भाईंदर वसई विरार |
| ४ | सफौ / १९६५ नितीन विठ्ठलराव चोधरी | पिंपरी चिंचवड | कोकण-२ विभाग | रायगड |



Scanned with CamScanner

६. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ अन्वये विशेष अनुमती याचीका क्र.२८३०६/२०१७ मधील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून पदोन्नती देण्यात येत आहे.

७. वर नमूद केलेल्या पदोन्नतीच्या आदेशाधिन असलेल्या पोलीस अंमलदाराविरुद्ध आता गुन्हा दाखल असेल / निलंबनाची कारवाई केली असेल / विभागीय चौकशी प्रलंबित असेल / शिक्षा प्रलंबित असेल / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल, किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील किंवा त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसेल किंवा अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाला नसल्याचे आढळून आले असेल किंवा अधिसंख्य पदावर वर्ग केले असेल तर संबंधित घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांच्या विरुद्धच्या प्रकरणांची सविस्तर माहिती या कार्यालयास ई-मेलद्वारे / फॅक्सद्वारे तात्काळ पाठवावी, व पुढील आदेशाची वाट पहावी.

८. पदोन्नती झालेल्या पोलीस अंमलदारांना पदोन्नतीवर कार्यमुक्त करण्यापूर्वी ते ज्या घटकांत पदोन्नतीवर जाणार आहेत, त्या घटकप्रमुखांकडे रिक्त पदांची खात्री करुनच त्यांना कार्यमुक्त करावे, रिक्त पदे नसल्यास तसे या कार्यालयास तात्काळ कळविण्यात यावे.

९. जर कोणत्या घटकामध्ये निवडणूकीची प्रक्रिया सुरु असल्यास किंवा त्या अनुषंगाने आचारसंहिता सुरु असल्यास घटक प्रमुखांनी त्याबाबत संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची काळजीपूर्वक दक्षता घ्यावी.

१०. सदर पदोन्नती आदेशातील पोलीस अंमलदाराला पोलीस उपनिरीक्षक पदावर तात्काळ हजर करुन घ्यावे व तसे या कार्यालयास न चुकता कळवावे, ही विनंती.

११. सदर आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर **FLASH** या शिर्षाखाली देखील उपलब्ध होतील.

१२. पदोन्नत झालेल्या उपरोक्त नमूद पोलीस अंमलदारांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

**( के.एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड/मिरा भाईंदर वसई -विरार/नवी मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र/कोल्हापूर परिक्षेत्र/कोंकण परिक्षेत्र, नवी मुंबई.
पोलीस अधीक्षक, रायगड / सातारा /वर्धा

प्रत सस्नेह,

महालेखाकार - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ महालेखाकार - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर.

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.राज्य, मुंबई.

२. यांना विनंती करण्यात येते की, उक्त पदोन्नती प्राप्त अधिकाऱ्यांसाठी १५ दिवसांचा "इंडक्शन कोर्स" आयोजित करण्यात यावा.

कार्यासन अधिकारी, का.क्र.,९.
कार्यासन क्र.५ मधील प्रमुख लिपीक यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
पोलीस उप अधीक्षक संगणक कक्ष-

२. सदरचे आदेश संकेतस्थळावर "स्थानापन्न पोलीस उप निरीक्षक पदी पदोन्नती (अर्हता-२०१३)-Officiating PSI Promotion Order (Qualifying Exam.२०१३)" या मथळ्याखाली ३० दिवसांकरिता प्रसिद्ध करण्यात यावे.

Scanned with CamScanner